मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543




रुबिना मुल्ला
कार्यकारी संपादिका
9890879757

वर्ष ७वे | अंक :१३ | रविवार,दि.२९ जुन ते शनिवार ०५ जुलै २०२५ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ — संपादकीय — या बायकांनी जावं तरी कुठे?
पान ३ — छत्रपती शाहू महाराज...
पान ४ — वसईतील खाऊ गल्लीतील...

## निळेमोरे तलाठी कार्यालयात ‘खाजगी’ हस्तक्षेप? —
# नागरिकांची हटविण्याची मागणी

तुळींज (प्रतिनिधी) – वसई तालुक्यातील निळेमोरे तलाठी कार्यालयात खाजगी मदतनीसाकडून कार्यालयीन कामकाजात हस्तक्षेप केल्या जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात आला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले असून, संबंधित खाजगी व्यक्तीला तात्काळ हटवण्याची मागणी प्रशासनाकडे करण्यात येत आहे.नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित मदतनीस शासकीय कर्मचाऱ्याच्या थाटात वागत असून, तक्रारदारांची कागदपत्रं, दाखले, व माहिती देण्याच्या प्रक्रियेत अडथळा आणत आहे. त्याला कोणतीही शासकीय नियुक्ती नसताना, तो नियमितपणे कार्यालयात उपस्थित राहून ‘दरबारी’ पद्धतीने काम करत आहे.तलाठी कार्यालय हे सरकारी कार्यालय आहे की खाजगी एजंटांचं



केंद्र?’ – असा सवाल संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या खाजगी मदतनीसाकडून कामे लवकर करून देतो या बहाण्याने अनौपचारिक स्वरूपात पैसे मागितल्याच्या घटनाही उघडकीस आल्या आहेत. त्यामुळे पारदर्शक शासकीय व्यवहारावर संशय व्यक्त केला जात असून, संबंधित तलाठ्याच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत.तहसीलदारांकडे लेखी तक्रार या प्रकरणाची गंभीरता ओळखून काही नागरिकांनी वसई तहसीलदारांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. त्यात स्पष्टपणे नमूद करण्यात आलं आहे की, ‘सदर व्यक्तीचा या कार्यालयात अधिकृत काहीही संबंध नसून, त्याची उपस्थिती प्रशासनासाठी लज्जास्पद आहे.’शासनाने दखल घेण्याची मागणीस्थानिकांनी याबाबत पालघर जिल्हाधिकारी, कोकण विभागीय आयुक्त व महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेही दखल घेण्याची मागणी केली आहे. तसेच, संबंधित तलाठ्याच्या कामकाजाचीही चौकशी व्हावी, अशी मागणी पुढे येत आहे.आमच्या गावातील तलाठी कार्यालयात प्रामाणिकपणा हवा, बिनधास्तपणे काम व्हावं, पण इथेच खाजगी लोकांनी अड्डा मांडला तर सामान्य जनतेचं काय?’ – असा सवाल स्थानिक महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला.



## वसई-विरार महापालिकेच्या कचरा व्यवस्थापन विभागात ’बनावट मजूर’ घोटाळा;
# RTI मध्ये माहिती लपवून अधिकाऱ्यांची जबाबदारी ठप्प!

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन विभागात ’बनावट मजूर’, ’बनावट हजेरी’, ’बनावट बिले’ आणि ’बनावट कारभार’ यांची साखळी उघडकीस येत असून, माहिती अधिकार कायद्याअंतर्गत (RTI) सत्य मागणाऱ्या नागरिकांनाच गंडवले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.RTI माहिती केवळ १%, तीही WhatsApp वर! दि. २४ नोव्हेंबर २०२४ रोजी माहिती अधिकारात आठ वर्षांचा लेखाजोखा मागवण्यात आला होता. मात्र, केवळ २-३ महिन्यांची अपूर्ण माहिती तीही व्हॉट्सअप आणि ई-मेलवर अनौपचारिकपणे पाठवण्यात आली. हा प्रकार RTI कायद्यातील कलम ७(१), ७(९), आणि कलम १८ चा स्पष्ट भंग असून, मुंबई उच्च न्यायालयाच्या परिपत्रकानुसार, अशा प्रकारे माहिती न देणे ही गंभीर प्रशासकीय चूक ठरते आणि संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो.

फसवेगिरी: बनावट मजूर, बंद बायोमेट्रिक, खोट्या हजेरीवर कोट्यवधींचा अपहार

महापालिकेच्या Solid Waste Managemen विभागात बनावट मजूर दाखवले

पान नं.२वर

## वसई-विरार महापालिकेत ’ऑफलाइन टेंडर’ घोटाळा?
# हजारो कामे, कोटींचा अपहार, आणि ’बुलेट स्पीड’ बिले!

महापालिका निवडणुकीच्या तोंडावर राजकीय कार्यकर्ते व त्यांच्या नातलगांना खूश करण्याच्या उद्देशाने वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागात एक मोठा ‘ऑफलाइन टेंडर’ घोटाळा उघड झाला आहे. १० लाख व ३ लाख रुपयांच्या हजारो कामांची शिफारस लोकप्रतिनिधींकडून राजकीय दबावाखाली झाली असून, ही कामे पारदर्शक ऑनलाईन पद्धतीऐवजी मॅनेज केलेल्या ऑफलाइन प्रक्रियेतून मंजूर करण्यात आल्याचा आरोप आहे.‘ऑनलाईनला निधी नाही – पण ऑफलाइन कामांची बिले धडधडाट?’पालिकेच्या अधिकृत ऑनलाइन टेंडर प्रणालीत काम मंजूर करायचं म्हटलं की, ’निधी नाही’ असा खुलासा महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून हमखास केला जातो. मात्र, तेच काम ऑफलाइन पद्धतीने मंजूर झालं की, बिले तत्काळ अदा केली जातात, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. मग अशा वेळी हा निधी कुठून येतो?, असा थेट सवाल नागरिक आणि सुजाण ठेकेदार उपस्थित करत आहेत.ऑनलाईनमधील स्पर्धा टाळण्यासाठी ’ऑफलाइन घोटाळा’?ऑनलाईन निविदा प्रक्रियेत सरासरी ८ ते १० ठेकेदार सहभागी होतात, आणि १० ते २०% ’मायनस’ दराने निविदा मिळते. यामुळे शासकीय निधीची बचत होते. याउलट, ऑफलाइन टेंडरमध्ये स्पर्धेचा अभाव, तीन ठेकेदारांची बनवाबनवी, आणि ‘प्लस’ दराने निविदा भरून तयार केलेला ठेकेदार निवडला जातो.

सर्वाधिक चिंतेची बाब म्हणजे — एकही ऑफलाइन काम आजपर्यंत सरकारी अंदाजित खर्चापेक्षा कमी दरात झालेले नाही.’बनावट सोसायट्या, बनावट बेरोजगार’ – आणि खरे सूत्रधार कोण?या घोटाळ्यातील रकमा मजूर सहकारी सोसायट्यांच्या किंवा सुरक्षित बेरोजगारांच्या बँक खात्यांमध्ये वर्ग केल्या जातात, अशी माहिती समोर आली आहे. हे खातेधारक केवळ प्यादी असून, खरे सूत्रधार ठरतात – पालिकेतील अधिकारी, अभियंते, आणि राजकीय वरदहस्त लाभलेले ठेकेदार.पारदर्शकतेवर थेट आघात – अपात्र कामांना प्राधान्य, पात्र ठेकेदार उपेक्षित!मागील दोन वर्षांत अनेक प्रामाणिक ठेकेदारांनी ऑनलाईन निविदा प्रक्रियेनुसार कामे पूर्ण केली आहेत. मात्र त्यांचे बिल वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. दुसरीकडे, ‘ऑफलाइन’ पद्धतीने मंजूर कामे ‘बुलेट ट्रेन’च्या वेगाने बिलं मिळवतात, ही स्थिती धक्कादायक असून निवडणूकपूर्व निधी जमवण्याच्या प्रयत्नांवर बोट ठेवते. शेकडो कोटींचा

पान नं.२वर

# संपादकीय...!

## या बायकांनी जावं तरी कुठे?

देशाची आर्थिक राजधानी. आशेचे, संधींचे, संघर्षाचे शहर. पण याच मुंबईत एका कोपऱ्यात आजही जगणं 'गुन्हा' समजलं जातं – तो कोपरा म्हणजे कामाठीपुरा. इतिहास सांगतो की, कामाठीपुरा ही केवळ वेश्या व्यवसायाची जागा नव्हती. ती होती, बेघर झालेल्या, पोटासाठी शरीर विकणाऱ्या, पण आत्मा जपणाऱ्या स्त्रियांची एक बकाल पण जिवंत वस्ती.

आता या परिसराचे पुनर्विकासाचं नाव घेतलं जातंय. विकास हवा, पण कोणासाठी? कामाठीपुरा मधील जुनाट इमारती पाडून तिथे 'टॉवर' उभे राहणार, चकचकीत फ्लॅट्स विकले जाणार – पण या सगळ्यात त्या मुलींना, बायकांना, त्यांच्या लेकरांना कुठे जागा आहे?पुनर्विकासाच्या नावाखाली या स्त्रियांची केवळ घरेच नव्हे, तर त्यांची 'जगण्याची चूक' दाखवून त्यांना हाकलण्यात येतंय. समाज नेहमीप्रमाणे त्यांच्याकडे तुच्छतेने, घृणेने पाहतो. पण कोणी विचारतो का, की या बायकांनी जावं तरी कुठे?विकास नव्हे, विस्थापन!हे पुनर्विकास नव्हे, हे सरळ 'संस्कारी विस्थापन' आहे. यापूर्वीही अशा स्त्रियांना हाकलून लावण्यात आलं. पण तेव्हा त्यांनी दुसरा कोपरा शोधला. आता पुन्हा हाच खेळ. अड्डे बदलतील, गल्ली बदलतील, पण शोषण मात्र तीच राहील. फक्त या वेळी शोषण करणारे 'बिल्डर, ब्रोकर आणि नवे राजकीय संरक्षक' असतील.शोषण संपत नाही, ते केवळ 'री-ब्रँड' होतं

कामाठीपुरा मधून हाकलण्यात आलेल्या बायकांना कुठे नांदवणार आहोत आपण? त्यांचं पुनर्वसन कोण करतंय? की हे 'विकास' प्रकल्प फक्त त्यांच्या पाठीवर पाय ठेवून उभे राहत आहेत? या बायकांचं शोषण केवळ 'स्थानिक दलाल' करायचे, आता ते काम 'प्रगत बिल्डर लॉबी' करत आहे. फरक फक्त रंगरूपाचा.समाज नजरेतून नव्हे, समजुतीतून पाहायला शिका

या बायकांचा अपराध काय आहे? गरिबी? पोटासाठी केलेला सौदा? की समाजाने सोडून दिलेलं त्यांचं अस्तित्व? आपण त्यांच्या पर्यायांसाठी काय केलं? शिक्षण? रोजगार? पुनर्वसन? जर काही केलं नसेल, तर त्या 'दलदलमध्ये होत्या' म्हणून त्यांना हाकलण्याचा आपल्याला काय अधिकार?

शेवटी प्रश्न राहतोच — 'या बायकांनी जावं तरी कुठे?'

या संपादकीयाचा उद्देश कुठल्याही अनैतिक कृत्याचे समर्थन करणं नाही. पण शोषित आणि वंचित वर्गाला विकासाच्या गोंडस शब्दांत गिळून टाकण्याचा विरोध करणं हे सामाजिक जबाबदारी आहे. विकास हवा, पण तो मानवी मूल्यांसोबत. या बायकांना 'डिलिट' करू पाहणाऱ्या समाजानं थोडं थांबावं, त्यांच्या डोळ्यांत एकदा डोकावून पहावं.कदाचित प्रश्न बदलेल...

'या बायकांनी जावं तरी कुठे?'

या प्रश्नाचं उत्तर आपण समाज म्हणून देणार आहोत का?

## वसई-विरार महापालिकेत ...पान नं.१वर

अपहार? ईडी आणि CBI चौकशीची मागणी

या साऱ्या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता, शेकडो कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येतो. त्यामुळे नागरिक आणि भ्रष्टाचारविरोधी कार्यकर्त्यांकडून याबाबत ईडी अंमलबजावणी संचालनालय (ED) मार्फत उच्चस्तरीय चौकशीची मागणी होत आहे. तसेच, संबंधित बँक खात्यांचे तपशील, व्यवहार व लाभार्थ्यांची चौकशी झाली, तर या संगनमताच्या कारभाराचे गूढ उकलले जाईल, असा ठाम विश्वास व्यक्त करण्यात येतो.

मुख्यमंत्र्यांची भेट – जनहितासाठी निर्णायक मोर्चा?

या घोटाळ्याच्या विरोधात राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची लवकरच भेट घेण्याची तयारी एका समाजसेवकाने चालवली असून, संबंधित सर्व दस्तावेज व पुरावे त्यांच्या समोर मांडले जाणार आहेत. यामुळे या प्रकरणात लवकरच मोठा राजकीय व कायदेशीर भूकंप होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## वसई-विरार महापालिकेच्या कचरा..पान नं.१वर.

जात असून, बायोमेट्रिक हजेरी मुद्दाम बंद ठेवून बनावट बिलांद्वारे मोठ्या प्रमाणात निधी शोषला जातो आहे. महापालिका अधिकारी, आरोग्य निरीक्षक, ठेकेदार व माहिती अधिकार अधिकारी यांचे संगनमत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे.सरकारी डंपरने खासगी कचरा उचलण्याचा 'गुप्त' व्यवसाय औद्योगिक व बांधकाम कचरा, जो कायद्याने खासगी उद्योगांनी स्वतःच्या खर्चाने हाताळणे बंधनकारक आहे, तोच कचरा महापालिकेचे सरकारी डंपर आणि ट्रॅक्टर वापरून उचलला जात आहे. यामध्ये कोणतीही निविदा प्रक्रिया अथवा अधिकृत परवानगी नसताना ठेकेदार व आरोग्य निरीक्षकांकडून खासगी मोबदल्यात ही सेवा पुरवली जात असल्याची माहिती समोर आली आहे. शासकीय यंत्रणा खासगी व्यवसायासाठी वापरणे हा ठोस भ्रष्टाचार आणि विश्वासघात आहे.RTI अपील पाण्यात; अपिलीय अधिकाऱ्यांचं मौन संशयास्पद!प्रथम अपील दि. १६ जानेवारी २०२५ रोजी दाखल करण्यात आले, तरी माहिती आयोगाकडून कोणतीही सुनावणी अथवा प्रतिसाद मिळालेला नाही. दि. २८ एप्रिल २०२५ रोजी आयुक्तांकडे तक्रार सादर करण्यात आली असतानाही, कोणतीही कारवाई झालेली नाही. यामुळे आयुक्तांच्याच मौनसंमतीने ही भ्रष्ट साखळी सुरू आहे की काय, असा प्रश्न निर्माण होतो.कायद्याचा स्पष्ट भंगः संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणीRTI कायदा, २००५ च्या कलम २०(१)नुसार, माहिती न देणाऱ्या सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यावर दंड आणि कारवाई करता येते. याशिवाय, माहिती लपवणे हे IPC कलम २१८ (जाणूनबुजून चुकीची अधिकृत नोंद करणे), ४०९ (शासकीय सेवकांकडून खाजगी मोबदल्यासाठी शासकीय संपत्तीचा वापर) अंतर्गतही गुन्हा ठरतो.या अधिकाऱ्यांवर आहे नागरिकांचा रोषः श्री. केदारे (माहिती अधिकारी) श्री. जितेंद्र नाईक श्री. धुमाळ श्री. गुंजाळकर अपिलीय अधिकारी नानासाहेब कामठे

वरील अधिकाऱ्यांनी RTI माहिती उघड न करून, ठेकेदारांना संरक्षण दिल्याचा आरोप असून, त्यांच्यावर गुन्हा नोंदवावा अशी नागरिकांची स्पष्ट मागणी आहे.

मुंबई उच्च न्यायालय, माहिती आयोग आणि भ्रष्टाचार निवारण विभागाने याची तात्काळ दखल घेऊन चौकशी करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व स्थानिक नागरिकांकडून होत आहे. अन्यथा, ही बाब जनहित याचिकेद्वारे न्यायालयात नेली जाणार, असा इशारा माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी दिला आहे.

## वसईतील खाऊ गल्लीतील...पान नं.४वर.

जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप काही सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. भविष्यात जर या नाल्यामुळे अपघात झाला, तर संबंधित अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

प्रशासनाकडून यासंबंधी कोणतीही ठोस पावले उचलली जात नसल्याने स्थानिकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. 'महापालिका प्रशासन नागरिकांच्या मृत्यूची वाट पाहत आहे का?' असा संतप्त सवाल सध्या सोशल मीडियावर गाजत आहे

## गुटखा माफियांची दादागिरी...पान नं.३वर.

आखले जात असल्याचे उघड झाले. प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे उपजिल्हाध्यक्ष विनायक खर्डे आणि शहर अध्यक्ष प्रमोद पारकर यांनी हस्तक्षेप करत वातावरण शांत केले. प्रभारी अधिकारी भगवान धांडे यांनी तात्काळ लक्ष घालत गुन्हा नोंदवला.कायदेशीर कारवाई-रात्री ११.३० वाजेपर्यंत चौकशी करून भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत कलम 223, 275, 351(2), 30(2)(a) आणि अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत कलम ५८ व ५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.गुटखा माफियांचे बळकट जाळे-गुजरात ते विरार दरम्यान गुटख्याची खुलेआम तस्करी होतेय. मजुरांच्या हाताने गोण्या वाहून घेतल्या जातात, तर सूत्रधार ऐशोआरामी जीवन जगतो. यामागे रेल्वे पोलिसांचं मूक समर्थन असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. अशा माफियांना जरब बसण्यासाठी कठोर कारवाईची मागणी नागरिक आणि पत्रकारांकडून होत आहे.पत्रकारांवर हल्ले – कायद्याचा अमल नाही?महाराष्ट्रात २०१९ मध्ये पत्रकार सुरक्षा कायदा (अ.क्र. २९) लागू करण्यात आला असून, पत्रकारांच्या कामाच्या ठिकाणी संरक्षणाची तरतूद आहे. मात्र, प्रत्यक्षात पोलीस प्रशासनाची अंमलबजावणी दिसून येत नाही, ही अतिशय चिंताजनक बाब आहे.राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची मागणीया घटनेचा निषेध करत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ने गुटखा माफियांवर कठोर कारवाई, RPF-GRP मधील दोषींवर निलंबन, आणि पत्रकार संरक्षण कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे.

## वातानुकूलित यंत्रे हटवा...पान नं.३वर.

दिनांक २५ मे २०२२ च्या अटींचा भंग असल्याचा आरोप भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते प्रा. डी. एन. खरे यांनी केला आहे.प्रा. खरे यांनी आयुक्त श्री. अनिलकुमार पवार यांना पत्र पाठवून, सदर वातानुकूलित यंत्रे तात्काळ काढून टाकावीत आणि शासन निर्णयाची अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी केली आहे.शासन निर्णयानुसार, केवळ सातव्या वेतन आयोगानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ अंतर्गत एस-३०: १४४२०० – २१८२०० किंवा त्यापेक्षा उच्च वेतनस्तरात येणाऱ्या अधिकाऱ्यांना दालनात वातानुकूलन सुविधा देता येते. तथापि, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत खरे यांनी मागवलेल्या माहितीनुसार, वसई-विरार महापालिकेतील कोणत्याही अधिकाऱ्याला सदर वेतनस्तरात वेतन अदा केले जात नसल्याचे दिनांक २६/०५/२०२५ रोजीच्या पत्रातून स्पष्ट झाले आहे. तरीदेखील प्रशासनाने शेकडो वातानुकूलित यंत्रे बसवून व वापरून जनतेच्या कररूपी निधीचा नियमबाह्य वापर केला आहे, असा आरोपही त्यांनी केला आहे.

प्रा. खरे यांनी आठ दिवसांच्या आत ही यंत्रे हटवावीत, अन्यथा पुढील कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.

# फादरवाडीतील आगीच्या घटनेनंतर अनधिकृत बांधकामांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले जाणार का?

### नोवा इंडस्ट्रियल इस्टेट समोरील फादरवाडी परिसरातील तबेल्याजवळ अनधिकृत औद्योगिक गाळ्यांची वाढ — स्थानिकांनी व्यक्त केली चिंता!

## वालीव विभागाचे सहाय्यक आयुक्त निलेश म्हात्रे यांच्यावर निष्क्रियतेचे आरोप



वसई / प्रतिनिधी :फादरवाडी परिसरात गुरुवारी दुपारी अंदाजे २.४५ वाजण्याच्या सुमारास एका भंगार गोदामास भीषण आग लागली. या आगीत आजूबाजूला असलेल्या काही अनधिकृत औद्योगिक गाळ्यांनाही नुकसान झाल्याची माहिती मिळाली आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणावर वित्तीय नुकसान झाल्याचे बोलले जात आहे.या घटनेनंतर परिसरातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नोवा इंडस्ट्री (सर्वे क्र. २२२/१) समोर व तबेल्याच्या शेजारील फादरवाडी भागात अनधिकृत औद्योगिक गाळ्यांचे बांधकाम सुरू असल्याचे स्थानिकांनी सांगितले. या बांधकामांना कोणाचे संरक्षण आहे? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.'अपघात झाल्यावरच जाग येते का?' – स्थानिकांचा सवाल नागरिकांनी सांगितले की, अशा प्रकारच्या अनधिकृत व निकृष्ट दर्जाच्या बांधकामांमुळे अनेक वेळा अग्निशमन दलालाही घटनास्थळी पोहोचण्यात अडथळा निर्माण होतो. त्याचा अनुभव या घटनेतही आला. या प्रकारांमुळे कामगार व स्थानिकांच्या जीवितास धोका निर्माण होत आहे.वालीव विभागाचे सहाय्यक आयुक्त निलेश म्हात्रे यांच्यावर काही स्थानिकांनी अनधिकृत बांधकामांवर आवश्यक ती कारवाई न केल्याचा आरोप केला आहे. त्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले असून, कारवाईसंदर्भात निष्क्रियतेचा आरोप केला जात आहे.अधिकाऱ्यांच्या बदल्याची मागणीया पार्श्वभूमीवर वसई-विरार शहर महानगरपालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार यांनी याप्रकरणात लक्ष घालावे, तसेच वालीव विभागात अधिक सक्षम व निष्पक्ष अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, अशी नागरिकांकडून मागणी होत आहे.

प्रशासनाचे लक्ष केवळ आगीत होरपळल्यानंतरच का जाते? या प्रश्नाचे उत्तर देण्याची वेळ पालिकेवर आली आहे,' असे नागरिक सूचित करत आहेत.

## वातानुकूलित यंत्रे हटवा : प्रा. डी. एन. खरे यांचे आयुक्तांना पत्र

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मुख्यालयासह इतर प्रभाग कार्यालयांमध्ये सुरू असलेल्या वातानुकूलित यंत्रांचा वापर हा शासन निणय क्रमांक शा.का.जा.-१०२२/प्र.क्र.१३/२२,

पान नं.२वर

# छत्रपती शाहू महाराज जयंती सोहळा उत्साहात साजरा..

### छत्रपती शाहू महाराज जयंती सोहळा उत्साहात साजरा राष्ट्रीय बहुजन विकास संघटना, प्रजा सुराज्य चॅरिटेबल ट्रस्ट व मदर सेवा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप



वसई,— सामाजिक न्यायाचा विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा या हेतूने, छत्रपती शाहू महाराज यांची जयंती वसईतील जिल्हा परिषद शाळा क्रमांक १ आणि उर्दू शाळा, वसई येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.हा कार्यक्रम राष्ट्रीय बहुजन विकास संघटना, प्रजा सुराज्य चॅरिटेबल ट्रस्ट आणि मदर सेवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात मदर सेवा फाउंडेशनचे प्रमुख मा. शाहिद शेख (मुन्नाभाई) यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पमाल अर्पण करून करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये शालेय साहित्य व खाऊ वाटप करून त्यांचा उत्साह द्विगुणित करण्यात आला.या प्रसंगी राष्ट्रीय बहुजन विकास संघटना व प्रजा सुराज्य पक्षाचे संस्थापक अध्यक्ष मा. शरदजी उर्फ अण्णासाहेब तिगोटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मार्गदर्शन करताना त्यांनी शाहू महाराजांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आरक्षण धोरणाच्या ऐतिहासिक निणयांचे महत्त्व पटवून दिले.'शाहू महाराजांनी सामाजिक समतेसाठी घेतलेले धाडसी निणय आजही मार्गदर्शक ठरत आहेत. त्यांच्या विचारांची गरज आजच्या पिढीला आहे,' असे ते म्हणाले.या कार्यक्रमासाठी प्रजा सुराज्य पक्षाचे जनरल सेक्रेटरी मा. शिवदास मोरे, माजी पोलीस अधिकारी मा. राहुल ऊडानशिव, दिव्यांग विभाग सचिव मा. नीलेश देशपांडे, महिला जिल्हा अध्यक्षा श्रीमती रमा जाधव, श्रीमती शिल्पा भावसार (माजी नगरसेविका), ॲड. मा. खालिद शेख, कार्याध्यक्ष मा. जितेंद्र शिरसाट, महाराष्ट्र युवा अध्यक्ष ॲड. आसिफ शेख, सचिव मीना तडवी, उपाध्यक्ष संतोष मद्रास, तसेच अनेक पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, छ. शाहू महाराजांचे विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजावेत, त्यांचा सामाजिक समतेचा आदर्श व्यापक स्वरूपात पोहचावा, यासाठी संघटना व ट्रस्टने जनजागृतीचा उपक्रम राबवण्याचे ठरवले आहे.

# गुटखा माफियांची दादागिरी : पत्रकारांना जीवे मारण्याची धमकी, RPF-GRPची कुंभकर्ण झोप!

विरार ´ प्रतिनिधी-विरार पश्चिम रेल्वे स्थानकावर फलाट क्रमांक २ वर गुटख्याच्या तस्करीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, पत्रकारांनी प्रश्न विचारल्यामुळे त्यांना गुन्हेगारी पद्धतीने धमकावण्यात आले. पोलिस यंत्रणांच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

२७ जून २०२५ रोजी सकाळी सुमारे ११ वाजता पत्रकार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) चे सहकार सेलचे जिल्हाध्यक्ष धर्मराज व्हटकर आणि पत्रकार व कामगार सेलचे जिल्हाध्यक्ष अनिल वाघेला हे विरार स्थानकावर असताना, काही तरुण मोठ्या गोण्यांसह संशयास्पदरीत्या फिरताना आढळले. चौकशी केली असता 'कपडे आहेत' असे उत्तर मिळाले. मात्र ना चलान, ना बिल असल्याने यावर शंका गडद झाली.या दरम्यान संशयितांनी खुलेआम **RPF**, **GRP** आमच्याच हातात आहेत, असे सांगून धमकी दिली. 'तुम्ही काहीही करा, येथे सर्व मॅनेज आहे,' असे म्होरक्याने उद्धटपणे सांगितले. ही बोलकी कबुली म्हणजेच भ्रष्ट यंत्रणेचा खालचा स्तर दाखवणारी खळबळजनक बाब ठरली.व्हटकर आणि वाघेला यांनी तत्काळ बोलींज पोलिस स्टेशन व ११२ हेल्पलाईनवर संपर्क केला, मात्र कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी स्टेशन मास्टर राजेश म्हात्रे यांच्या हस्तक्षेपाने व वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांच्या सूचनेनंतर काहीशी हालचाल झाली.स्थानिक पोलीस पोहचले, परंतु रेल्वे हद्दीत प्रकरण असल्याने त्यांनी माघार घेतली. अखेर **RPF** कॉन्स्टेबल आले आणि संबंधित चार जणांना ताब्यात घेऊन पुढील चौकशीसाठी **GRP** कडे सोपवले.

**GRP** कार्यालयातच धमक्या?वसई रोड GRP कार्यालयात चौकशीसाठी नेताच, संशयितांच्या अन्य साथिदारांनी कार्यालयात गर्दी करत पत्रकारांवर हात उचलण्याचा प्रयत्न केला. 'तुमच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल करतो,' अशी धमकी दिली गेली. पत्रकारांना भडकावण्याचा प्रयत्न करून त्यांच्यावर खोटे गुन्हे लावण्यासाठी योजनाबद्ध कटकारस्थान

पान नं.२वर


# वसईतील खाऊ गल्लीतील नाला जीवघेणा ठरू शकतो!

## स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये नाला धोकादायक घोषित, तरीही प्रशासनाचे दुर्लक्ष; नागरिकांमध्ये संताप



वसई :वसई-विरार महापालिकेच्या 'आय' प्रभागातील खाऊ गल्ली परिसरातील नाला धोकादायक स्थितीत असल्याचा स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट काही वर्षांपूर्वीच बाजार विभागाला सादर करण्यात आला होता. मात्र, आजवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे या नाल्याचा भाग कधीही कोसळून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे, असा इशारा महापालिकेचे कार्यकारी अभियंता प्रकाश साटम यांनी दिला आहे.महापालिकेच्या बांधकाम विभागाने सदर नाला धोकादायक असल्याचे घोषित करून फक्त फलक लावून आपली जबाबदारी पूर्ण केल्याचे दिसून येते. हे फलक काहीच दिवसांत हटवले गेले, आणि त्यानंतर प्रशासनाने या भागाकडे पाठ फिरवली आहे. नागरिकांच्या जीवाची जबाबदारी कोण घेणार? असा सवाल आता विचारला जात आहे.विशेष म्हणजे, महापालिकेने याच नाल्यावर अभ्यासिका उभारली आहे. धोकादायक ठरवलेला नाला आणि त्यावरच उभ्या केलेल्या अभ्यासिकेमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या अभ्यासिकेचे बांधकाम सुरक्षित असल्याचा दावा अधिकाऱ्यांनी केला असला तरी, या सुरक्षिततेची लेखी हमी मात्र दिली जात नाही.दरम्यान, सध्या कार्यरत असलेल्या सहाय्यक आयुक्त अलका खैरे यांनी या प्रकरणाकडे

पान नं.२वर




वसई | प्रतिनिधी-वसई पूर्वेतील सातिवली परिसरात मानव रेसिडेन्सी समोर असलेल्या सर्वे नंबर ५० वरील अनधिकृत बांधकामावर अखेर महानगरपालिकेने कारवाई केली आहे. ही कारवाई साधी प्रशासनिक प्रक्रिया नसून, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट)च्या नेत्यांच्या ठाम आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे घडून आली आहे.या कारवाईसाठी विशेषतः पक्षाचे सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष तथा सरचिटणीस रोहित ससाणे, जिल्हा उपाध्यक्ष विनायक खर्डे आणि सहकार सेलचे जिल्हाध्यक्ष धर्मराज व्हटकर यांनी सातत्याने महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर दबाव आणला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आणि अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांच्या आदेशावरून ही कारवाई अंमलात आणण्यात आली.स्थानिक रहिवाशांनी अनधिकृत बांधकामांविरोधात अनेक वेळा तक्रारी दाखल केल्या होत्या, मात्र प्रशासनाकडून दुर्लक्ष होत होते. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी हा मुद्दा राजकीयदृष्ट्या लावून धरल्यामुळे अखेर प्रशासनाला पावले उचलावी लागली.पक्षाचे नेते रोहित ससाणे यांनी म्हटले की, 'विकासाच्या नावाखाली बेकायदेशीर बांधकामांना आंधळा पाठिंबा देणे आम्ही सहन करणार नाही. कायदा आणि शिस्त टिकवण्यासाठी ही कारवाई आवश्यक होती.'या कारवाईनंतर सातिवली परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाची भावना असून, स्थानिक विकास व न्यायासाठी लढणाऱ्या पक्षाच्या भूमिका अधिक बळकट झाल्या आहेत.

# 'प्रभाग ते मुख्यालय' अधिकारी विकले गेले?

## रामू गुप्ता यांचे कथित रेटकार्ट उघड!

वसई-विरार महापालिकेच्या विविध विभागांमध्ये रामू गुप्ता नावाच्या बांधकाम व्यावसायिकाने अधिकारी विकत घेतल्याचा गंभीर आरोप उपस्थित झाला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, प्रभाग समिती 'जी' पासून ते विरार मुख्यालयापर्यंतच्या अधिकाऱ्यांचे रेट रामू गुप्ताने स्वतः ठरवले, असा धक्कादायक गौप्यस्फोट स्थानिक नागरिक आणि नगरसेवकांनी केला आहे.

**१० अवैध गाळ्यांना संरक्षण?**

रामू गुप्ताने उभारलेल्या किमान १० अवैध गाळ्यांवर कोणतीही अधिकृत कारवाई करण्यात आलेली नाही. यावरून स्थानिकांचा आरोप आहे की, महानगरपालिका अधिकारी त्याच्याच खिशात आहेत. संबंधित गाळ्यांचे छायाचित्र, भूखंड क्रमांक, आणि तक्रारी उपलब्ध असतानाही कारवाईचा मागमूस नाही.'कारवाई झाली, तर रेट फसवे; झाली नाही तर अधिकारी खरेदी'!स्थानिकांनी थेट प्रश्न उपस्थित केला आहे:जर महापालिका रामू गुप्ताच्या अवैध बांधकामांवर कारवाई करते, तर याचा अर्थ गुप्ता खोटं बोलतो आणि अधिकाऱ्यांची मानमरातब जपली जाते. परंतु जर कारवाई होत नसेल, तर हेच अधिकारी



गुप्ताच्या रेटकार्टनुसार विकले गेलेत हे स्पष्ट होतं.'**भूमाफियांचा दबाव? की प्रशासनाची मौनसंमती**?रामू गुप्ताचे महापालिकेतील अनेक शाखांमध्ये 'संपर्क' असल्याचे भासते. प्रभाग अधिकारी, बिल्डिंग इन्स्पेक्टर, झोन प्रमुख ते मुख्यालयातील वरिष्ठ यांपर्यंत त्याच्या 'सेटिंग'चा बोलबाला नागरिकांत आहे.हेच अधिकारी इतर सामान्य बांधकामांवर तातडीने कारवाई करत असताना, रामू गुप्ताचे गाळे मात्र 'कायदेशीर' असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येते.कारवाई न झाल्यास, आंदोलनाची चेतावणी स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि पारदर्शक प्रशासनाचे समर्थक यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की –'या कथित 'रेट लिस्ट'चा तपशील सार्वजनिक करा, आणि त्वरित अवैध गाळ्यांवर तोडक कारवाई करा. अन्यथा आम्ही प्रभाग कार्यालय, झोन कार्यालय आणि मुख्यालयात ठिय्या आंदोलन करू.'

**प्रश्न अनुत्तरित...**

**रामू गुप्ताने जर अधिकाऱ्यांना रेट देऊन विकत घेतले, तर त्या पैशांचा स्रोत काय?**

**महानगरपालिका प्रशासन कारवाई न करण्याच्या भूमिकेवर ठाम का?**

**गुप्ताचे गाळे 'कायदेशीर' असल्याचा दाखला देण्यामागे कोणता दबाव?**

**शेवटी काय होणार?**

आता येणारा काळच ठरवेल की – रामू गुप्ता खोटं बोलून प्रशासनाला बदनाम करत आहे की खरंच काही अधिकारी गुप्तासारख्या भूमाफियांच्या खिशात आहेत?

या प्रकरणात महसूल व नागरी प्रशासन विभागाने स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय- ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad
RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ मे. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in